# अक्षरवेध

सर्जनशील शिक्षण



डोअर स्टेप स्कूल - परिवर्तन प्रशिक्षण केंद्र

अंक – १ एप्रिल २०१६ – जून २०१६

Door Step School
Education moves on to every doorstep

# परिवर्तन विषयी

शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या ३ ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्याच्या कामात डोअर स्टेप स्कूल ११९३ पासून पुणे शहरात कार्यरत आहे. बांधकाम कामगारांच्या मुलांना शिक्षणाचा हक्क मिळवून देण्याच्या कामात संस्थेची मुळातील बांधिलकी आहे.

वरील उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी डोअर स्टेप स्कूलअंतर्गत विविध प्रकल्प राबवले जातात. या प्रकल्पांची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी लागणारी कौशल्ये व कर्मचारांच्या क्षमताबांधणीकरता संस्था विशेष कार्यदक्ष आहे, हे डोअर स्टेप स्कूलने २००७ मध्ये सुरु केलेल्या "परिवर्तन ट्रेनिंग सेंटरच्या" माध्यमातून दिसून येते.

आपल्या कामांच्या पद्धतीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याकरिता, स्वत:च्या कामाची गुणवत्ता वाढ होण्याकरिता, योग्य दिशेने व सृजनशीलतेने काम होण्याकरिता कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची नितांत गरज असते. कारण यामुळे प्रकल्प उद्दिष्टांची अंमलबजावणी व प्रभावी वितरण होण्यास मदत होते. याच दृष्टीने डोअर स्टेप स्कूलने ट्रेनिंग सेंटर सुरु केले. जे पुढील २ मुद्द्यांना लक्ष्य करून कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देते-

१. कर्मचाऱ्यांचे कौशल्य व डोअर स्टेप स्कूलचे उद्दिष्ट यांची सांगड घालणे.
२. कर्मचारी करत असलेल्या कामाव्यतिरिक्त इतर प्रकल्पातील काम करण्याकरीता कर्मचाऱ्यांना सक्षम बनवणे.

डोअर स्टेप स्कूलच्या सर्व प्रकल्पातील उपक्रमांच्या गरजेनुसार या ट्रेनिंग सेंटरच्या माध्यमातून कर्मचार्यांना प्रशिक्षण दिले जाते.

परिवर्तन ट्रेनिंग सेंटर केवळ डोअर स्टेप कर्मचार्यांनाच नव्हे तर इतर संस्थांच्या कर्मचार्यांना देखील त्यांच्या मागणीनुसार मार्गदर्शनपर प्रशिक्षण देत आहे.

**उदा. अ) सप्टेंबर २०१५ मध्ये पुण्यातील म.न.पा. शाळांमधील एकूण ८० 'शिक्षणसहयोगींना' इयत्ता यावर मार्गदर्शनपर प्रशिक्षणाचे आयोजन केले होते.**

ब) जुलै २०१५ मध्ये 'मशाल' संस्थेतील कर्मचाऱ्यांना 'जोडाक्षरे' मुलांना कशी शिकवावी व भाषिक साधनांचा वापर कसा करावा या विषयावर आधारित प्रशिक्षणाचे आयोजन केले होते.

प्रशिक्षकांना देखील प्रशिक्षणाची गरज आहे हे ओळखून ऑगस्ट २०१५ मध्ये डोअर स्टेप स्कूलने Train The Trainers हा उपक्रम सुरु केला. ज्या अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन, Email Etiquettes, इंग्रजी संवाद इ. उपयुक्त विषयांना घेऊन डोअर स्टेप स्कूलमधील प्रशिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात आले . याचबरोबर प्रशिक्षकांच्या क्षमताबांधणीकरिता त्यांना इतर संस्थांच्या उपयुक्त विषयांवर असलेल्या प्रशिक्षणांना देखील पाठवले जाते.

Door Step School
Education moves on to every doorstep

# अनुक्रमणिका


| क्रमांक | सूची | पान नं. |
|---|---|---|
| १ | अक्षरवेध विषयी... | १ |
| २ | या अंकात...... | २ |
| | **विषय** | |
| **3** | शिकता शिकविताना... | ३ ते ७ |
| ४ | शिक्षण साधनसाहित्यातून | ८ ते १३ |
| ५ | अनुभवातून शिक्षण | १४ ते १७ |
| ६ | एप्रिल २०१६ ते जून २०१६ या कालावधीत घेतलेली प्रशिक्षणे | १८ ते १९ |
| ७ | फोटो गॅलरी | २० ते २३ |
| ८ | संक्षिप्त रुपे | २४ |


Door Step School
Education moves on to every doorstep

# अक्षरवेध

'अक्षरवेध' चा पहिला अंक प्रकाशित करताना आम्हाला विशेष समाधान वाटत आहे. यंदाच्या वर्षी दशकपूर्तीचे निमित्त साधून परिवर्तन प्रशिक्षण केंद्राने सामाजिक क्षेत्रात काम करणा-या तुम्हा- आम्हा सर्वांसाठी 'नवं काहीतरी' देण्याचा प्रयत्न केला आहे. हे नवं तुमच्यासाठी वेचक आणि वेधक ठरावं म्हणून याचं नाव आम्ही 'अक्षरवेध' म्हणजेच कधीही क्षर न होणारं विशेषतः शिक्षण क्षेत्रात काम करणा-यांना दिर्घकालासाठी दिशादर्शक असावं असा उद्देश आहे.

हे मासिक त्रैमासिकाच्या स्वरुपात आम्ही प्रकाशित करणार आहोत. सकारात्मक बदल करणे हे परिवर्तन प्रशिक्षण केंद्राचे उद्दिष्टच असल्याने डोअर स्टेपच्या कार्यकर्त्यांना तसेच इतर संस्थांना प्रशिक्षण देण्यात आम्ही खारीचा वाटा उचलू शकलो याचा आम्हाला आनंद होत आहे. शिक्षणाबरोबरच भाषा विकास, विविध कौशल्ये, शिक्षणातील नवे प्रवाह, सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनिय कार्ये, शैक्षणिक संशोधने, मत-मतांतरे इत्यादी विषयांवर आम्ही भर देणार आहोत. या साहित्यनिर्मीती मधे परिवर्तनच्या त्रैमासिकात विविध विषयांवर लेखन करण्याचे आवाहन आम्ही सर्व कार्यकर्त्यांना करत आहोत.

# या अंकात ......

"शिक्षण" माणसाच्या पाच मुलभूत गरजांपैकी एक होय ! पाच मुलभूत गरजा - अन्न,वस्त्र,निवारा, आरोग्य आणि शिक्षण.

शिक्षणाची व्याख्या करायची ठरवली तर काय करावी? ज्ञान ग्रहण करणे म्हणजे शिक्षण कि, ज्ञान वृद्धिंगत करणे म्हणजे शिक्षण. एखादे काम करण्याची पध्दत शिकणे कि, ते काम करण्याच्या नवनवीन पद्धती शिकणे म्हणजे शिक्षण.शिक्षणाचा परिघच मुळात खूप मोठा आहे. त्यामुळे एखादी विशिष्ट गोष्ट शिकणे म्हणजे शिक्षण असे नाही. त्याचप्रमाणे एखाद्या विशिष्ट पद्धतीनेच कायम शिक्षण घ्यावे किंवा शिकवावे असे ही नाही.

शिक्षणाच्या काही पारंपारिक पद्धती आपल्याला माहितच आहेत पण काही नवीन पद्धती अशा आहेत ज्याने आपण अजून कल्पकतेने शिकू शकतो व शिकवू शकतो. अशाच काही नवीन पद्धती आपण पुढे पहाणार आहोत.

चला तर या सृजनशीलतेच्या विश्वात सैर करूयात व हसत खेळत शिक्षणाचा मार्ग सोपा करूया...

# शिकता शिकविताना

अध्यापन हे एक कौशल्य आहे. अध्यापन व संशोधन एकमेकांना पूरक असतात.

त्यासाठी चांगले प्रशिक्षक होण्याची क्षमता, ज्ञानाविषयी आदर, दुस-याला सहभागी करुन घेण्याची क्षमता, इतरांबरोबर ज्ञानाची देवाण घेवाण करुन ते संग्रहीत करण्याची क्षमता या सर्व गोष्टींची आवश्यकता असते.

मुलांची बुध्दिमत्ता ओळखून त्यानुसार मुलांना वेगवेगळया संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजे. त्यानुसार शिकवण्याच्या पध्द्तीत बदल केला पाहिजे. उदा- जर मुलाची/ मुलीची निसर्गविषयक बुध्दिमत्ता असेल तर त्याला निसर्गविषयक सर्व बाबींची माहिती देणे. नद्या डोंगर ,पक्षी, प्राणी इ. सहलींच्या माध्यमातून प्रत्यक्ष अनुभव देणे याप्रमाणे संधी आपण पुरवू शकतो. अशा शिकवण्याच्या पध्दतींमुळे मुलांची मेंदुतील पेशींची बांधणी पक्की होऊ शकते व मुले चांगल्या पध्द्तीने ज्ञान ग्रहण करू शकतात.

शिकवण्यामध्ये किती शिकवले यापेक्षा शिकवण्याच्या गुणवत्तेला अधिक महत्व असते.

मुलांच्या ज्ञानात भर ही प्रत्यक्ष कृतीतून, अनुकरणातून, अनुभवातून पडते. विद्यार्थांना स्वतःहून शिकावेसे वाटेल आणि ज्ञान मिळविता येईल यासाठी त्यांच्यामधे उत्सुकता निर्माण व्हायला हवी.

**अध्यापन करताना लक्षात ठेवण्याच्या गोष्टी-**

- मुलांबरोबर भाषेचा भरपूर वापर करणे, प्रश्न विचारणे, मनातील विचार अभिव्यक्त करणे, मुलांच्या कलांचा विचार करणे गरजेचे असते.
- मुलांना शिकविण्याआधी भरपूर तयारी असावी. मुलांना समजायला कोणता भाग अवघड जाईल. काय अडचणी येतील याचा विचार करायला हवा.
- दरवेळी मूल आपल्यापर्यंत पोहोचण्याची वाट पाहण्यापेक्षा आपण त्याच्यापर्यंत पोहोचावे हे शिक्षकाला वाटायला हवे.

- मुलांच्या बाबतीत आपण जशा अपेक्षा ठेवतो तशाच मुलांच्या आपल्याबाबतीत अपेक्षा असतात हा दृष्टीकोन असावा.
- मूल किती जबाबदारी पेलू शकेल याचा अंदाज घ्यायला हवा.

**मुलांना शिकवताना काही तत्वांचा वापर केला तर शिकणे व शिकविणे सोपे जाईल.ती पुढील प्रमाणेः-**

१.सोप्याकडून अवघडाकडे

२.मूर्ताकडून अमूर्ताकडे

३.परिचिताकडून अपरिचिताकडे

४.आत्ता इथे तेव्हा तिथे

**मूल हे पंचेंद्रियामार्फत शिकत असते.**

- उदा- वस्तूला हात लावल्यावर आपल्याला वस्तूचा स्पर्श कसा आहे ते समजू शकते. इथे त्वचा या इंद्रियाचा वापर केला जातो.
- डोळ्यांनी वस्तूचा रंग, आकार समजतो.
- नाकाने त्या वस्तूला वास आहे की नाही ते समजते.
- कानाने आवाज ऐकू येतो.
- जीभेने चव ओळखता येते.


मुलांना शिकविताना भाषेचा भरपूर वापर करणे, प्रश्न विचारणे, मनातील विचार अभिव्यक्त करणे, मुलांच्या कलांचा विचार करणे गरजेचे असते.

- मुलांना शिकविण्याआधी भरपूर तयारी असावी. मुलांना समजायला कोणता भाग अवघड जाईल. काय अडचणी येतील याचा विचार करायला हवा.
- दरवेळी मूल आपल्यापर्यंत पोहोचण्याची वाट पाहण्यापेक्षा आपण त्याच्यापर्यंत पोहोचावे हे शिक्षकाला वाटायला हवे.

➢ मुलांच्या बाबतीत आपण जशा अपेक्षा ठेवतो तशाच मुलांच्या आपल्याबाबतीत अपेक्षा असतात हा दृष्टीकोन असावा.

➢ मूल किती जबाबदारी पेलू शकेल याचा अंदाज घ्यायला हवा.

**शिकवण्याच्या पध्दती**




**वरील काही विशिष्ट शिक्षणपध्दतींची माहिती खालीलप्रमाणे-**

- **संवादाच्या** माध्यमातूनही आपण मुलांना खूप गोष्टी शिकवू शकतो. मूल जन्माला आल्यापासून इतरांशी संवाद साधायला उत्सुक असते. अशावेळी सतत त्याच्याशी बोलणे/संवाद साधने गरजेचे असते. इथूनच मुलांच्या आयुष्याची सुरुवात होत असते.
- **देहबोलीतून** मुलांना वेगवेगळया भावना समजतात.
- **गोष्टींच्या** वेगवेगळया पध्दतींमधून मुलांना शिकविणे.

- **निरिक्षण** ही एक शिकवण्याची पध्दत होऊ शकते. मुलांना त्यांच्या परिचयाच्या माहितीच्या गोष्टी दाखवून परिसराचे निरिक्षण करूनही खूप सा-या गोष्टींचे ज्ञान आपण देऊ शकतो.
- **सृजनशीलकृतींमुळे** मुलांचा मानसिक, बौध्दिक, शारिरीक विकास होतो. कल्पनाशक्तीला वाव मिळतो त्यामुळे सृजनशीलकृती हे शिकविण्याचे व शिकण्याचे छान माध्यम आहे.
- वेगवेगळया **साधन साहित्यांचा** वापर करून मुलांना शिकविणे. लहान वयात प्रत्येक गोष्ट हाताळून पाहण्याचा मुलांचा स्वभाव असतो. शालेय शिक्षणात हाताने काही वस्तू साधने हाताळून काही कृती करत करत शिकले तर त्यातील बारकावे, संकल्पना समजणे सोपे जाते. एवढेच नव्हे तर अशा संकल्पनांचा चांगला उलगडा होऊन शिकलेले दिर्घकाळ स्मरणात राहते . उदा- चित्र, पझल्स, कोडी इ. म्हणजेच साधनांचा वापर करून शिकविणे ही सर्वात प्रभावी पध्दत आहे.
- **प्रकल्प पध्दत** ही एक शिकण्याची व शिकविण्याची चांगली पध्दत आहे, ज्यातून मुलांना प्रत्यक्ष अनुभव वेगवेगळया गोष्टींची माहिती देऊ शकतो. आजूबाजूचा जीवन व्यवहारातील एखादा विषय निवडून त्या विषयाला सर्वांनी समजून घेणे, त्याच्या सर्व बाजूंचा सखोल अभ्यास करणे, हा अभ्यास करण्यासाठी जो जो शोध घ्यावा लागेल तो शोध घेणे. गटातील सर्व मुलांनी आपापल्या क्षमतांचा आणि कौशल्यांचा वापर करून प्रकल्प तयार करणे, त्याची मांडणी करणे अशा सर्व गोष्टी प्रकल्पामध्ये होतात. यामध्ये प्रत्येक मुलाला आपल्या बुध्दिमत्तेचा वापर करण्यास वाव मिळतो. एकत्र येऊन एकमेकांच्या साहाय्याने शिकण्याची संधी मिळते. आजूबाजूच्या वास्तव जीवनाची ओळख होते. वेगवेगळया पध्दतींचे अनुभव मिळतात व त्यातून शोध घेण्याची प्रवृत्ती विकसित होते.
- **संगीत,कथाकथन** अशा वेगवेगळया माध्यमातून मुलांना शिकण्याचा अनुभव द्यावा. लहान मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या प्रत्येक आघाडीवर संगीत परिणाम करु शकते. संगीत आणि भाषेचे नाते सोपे आहे. म्हणून बडबड गीताच्या माध्यमातून उच्चारलेले शब्द स्मरणात राहतात.

- **वृत्तपत्रांमधील** बातम्यांचे वाचन करणे त्यावर मुलांच्या प्रतिक्रिया घेणे.
- वेगवेगळ्या **भाषिक खेळांमधून** मुलांना शिकविणे.
- **नवीन वैज्ञानिक** खेळणी, टाईपरायटर, कॅमेरा, टेपरेकॉर्डर, कॉम्प्युटर अशा माध्यमांचा वापर करून मुलांना जास्तीत जास्त माहिती द्यावी. प्रत्यक्ष अनुभव द्यावा.
- **सहलींच्या** माध्यमातून मुलांना वेगवेगळी माहिती द्यावी.

संदर्भः-


1. आनंददायी शिक्षण भाग एक- राजश्री तिखे
2. रचनावादी शिक्षण – रमेश पानसे
3. ग्राममंगल शिक्षणवेध, अंक दुसरा
4. बालशिक्षणाची ज्ञानगंगा भाग-६- मादाम मॉन्टेसोरी
5. बालशिक्षणाची ज्ञानगंगा भाग-१७

# शिक्षण – साधन साहित्यातून

कोणत्याही बौध्दिक कामात शारीरिक क्रियेचा जर भाग मिळाला तर तो उपयुक्त ठरून ते बौध्दिक काम चांगल्या प्रकारे साध्य करता येईल. स्वतः हाताने केलेली गोष्ट चांगलीच लक्षात राहते असा आपल्यालाही अनुभव आहे. लहान वयात जर मुलांना प्रत्येक गोष्ट हाताळून पाहण्याची सवय लावली, प्रत्यक्ष कृती करून शिकण्याची सवय लावली तर त्यातील बारकावे , संकल्पना समजणे सोपे जाते आणि शिकलेले दिर्घकाळ स्मरणात राहते.

अलिकडे भाषा, गणित व अन्य कोणताही विषय समजावून सांगण्यासाठी किंवा समजावून घेण्यासाठी विविध शैक्षणिक साधने उपलब्ध असतात. साधन साहित्यातून शिकणे किंवा शिकविणे ही बालशिक्षणात, प्राथमिक शिक्षणात वापरली जाणारी प्रभावी पध्दत आहे.

➢ **शिक्षण आनंदाचे कसे होईल?**

- शिकण्याची आवड मुलांमध्ये निर्माण झाली असेल तर
- शिकत असलेल्या गोष्टी समजत असतील तर
- मूल स्वतःच्या अनुभवातून व निरिक्षणातून शिकत असेल तर

साधन साहित्यातून मुलांबरोबर बसून प्रत्यक्ष कृती करून जर शिकवले तर ते मुलांना समजायला अवघड जात नाही त्याना लवकर समजते व कायमस्वरूपी लक्षातही राहते. उदाः- जर एखादे मुळाक्षर मुलांना शिकवायचे असेल तर ते मुळाक्षर कानगोष्टी, गप्पा गोष्टी तसेच शब्दसाखळीच्या माध्यमातून शिकवले तर मुलांचे श्रवणकौशल्य विकसित होते आणि भाषेचे आकलनही वाढते. जेवढे साधन साहित्यातून आपण शिकवू तेवढे मुलांना समजणे सोपे जाते.

साधनातून शिकवताना मुलांना सोप्याकडून अवघडाकडे शिकविले जाते. वेगवेगळया प्रकारचे साधने हाताळण्यास मिळाल्यामुळे मुले एका जागी स्थिर व गुंतून राहतात. गटात काम करण्यास शिकतात. विचारांची देवाणघेवाण होते. भाषा विकास होतो.

## ➢ साधन साहित्याचा उद्देशः-

- स्नायूंचा विकास होतो.
- निरिक्षणशक्ती वाढते.
- मुलांचा सर्वांगिण विकास होतो.
- स्मरण शक्ती वाढते.
- मनोरंजन होते.
- उच्चार स्पष्ट होतात.
- मुले बोलकी होतात.

साधनाचा वापर करताना मुलांना योग्य त्या सूचना देवून आपण कमी व मुलांना जास्त बोलण्याची संधी द्यावी. साधनातून मूल स्वतः अनुभव घेत असते. ज्यावेळेस मूल साधनातून शिकत असते तेव्हा मुलाने विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आपण दिले पाहिजे तेव्हाच ते साधन साहित्य त्याला समजेल. दिलेल्या साधनाचा योग्य तो उपयोग होतो का नाही ते बघणे ही गरजेचे आहे. फक्त 'हो' किंवा 'छान' असे म्हणून उपयोग नाही. थोडक्यात साधन साहित्य वापरताना ऐकणे, त्यावर विचार करणे आणि प्रतिसाद देणे त्यानंतर बोलणे हे खूप गरजेचे आहे.

## ➢ साधन साहित्याचे फायदे-

- एका जागी बसण्याची सवय लागते.
- साधनामुळे मूल लवकर शिकते.
- शिकण्याची आवड निर्माण होते.
- गटात काम करण्याची सवय लागते.
- एकमेकांना मदत करण्यास शिकतात.
- नवनवीन गोष्टीची माहिती होते.
- वेगवेगळया साधनाची / खेळाची माहिती होते.
- नवनिर्मितीचा आनंद मिळतो.
- प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण

साधन-साहित्यातून मुलांना खालील टप्प्यांच्या साह्याने शिकवता येते.

1) वाचनपूर्व तयारी
2) अक्षर ओळख
3) स्वरचिन्हे ओळख
4) जोडाक्षर ओळख
5) वाक्यवाचन
6) परिच्छेद वाचन
7) आकलन

- **वाचन पूर्वतयारी** –वाचनाच्या आधीची तयारी म्हणजे वाचन पूर्वतयारी होय.

वाचन पूर्वतयारी करताना प्रथम गाणी, गोष्टी बडबडगीते इ.चा वापर करावा. तसेच चित्र, वस्तूंचा वापर करून शिकवावे. उदाः- सारखे-वेगळे, लहान-मोठा ओळखणे. तसेच चार्टचा वापर करून वेगळे चित्र ओळखण्यास सांगणे. दोन चित्रांमधील सूक्ष्म फरक ओळखण्यास सांगणे इ. अशा पध्दतीने सराव घेतल्यानंतर मुळाक्षरांची ओळख मुलांना करून देणे.

- **अक्षरओळख**

१. अक्षर कार्डांच्या मदतीने अक्षर कार्ड व शब्दाशी जुळवणे.
उदा- “अमन” या शब्दकार्डाशी जुळविण्यासाठी ‘अ’ , ‘म’, ‘न’ अक्षर कार्डे शोधून ती अमन या शब्द कार्डाखाली मांडणे व वाचन करणे.

- चित्र कार्डाशी अक्षरकार्डांच्या जोड्या लावणे.
  यात एक अक्षर कार्ड देऊन त्याचे वाचन करणे.
  -अक्षरापासून सुरु होणारे चित्र कार्डे शोधणे.



Door Step School
Education moves on to every doorstep

अक्षराचे मोठे आकार वर्गात काढा. व त्यावर विविध वस्तू [दगड, फुले,इ.] ठेऊन आकार पुर्ण करणे.

- शिक्षकाने हवेत अक्षराचे आकार काढणे व विद्यार्थ्यांनी ओळखणे, नंतर स्वतः अक्षर सांगणे व विद्यार्थ्यांना त्याचे हवेतील आकार काढण्यास सांगणे. दोन विद्यार्थी किंवा गटामध्येही असा सराव घेता येतो.

- पाटीवर/जमीनीवर माती/वाळू पसरणे व त्यावरील अक्षराचा आकार ओळखणे. नंतर तसे आकार बोटाने काढण्याचा सराव घेणे.

वरील टप्प्यांचा उपयोग करताना घाई करु नये. एखाद्या टप्प्यात घाई झाल्यास विद्यार्थी त्यापुढील टप्प्यात गोंधळतात. या ठिकाणी एकही अपरिचित शब्द नको.

पुरेसा सराव व विविध पध्दतीचा अवलंब जेणे करुन मुले कंटाळणार नाहीत व उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवतील.

- **स्वरचिन्ह ओळख** – अक्षरांची ओळख झाल्यानंतर मुलांना स्वरचिन्हांची ओळख करून द्यावी.

  - ‘काना’ शिकवायचा असल्यास वेगवेगळया साधनांचा वापर करून शिकवावा.उदाः- जमिनीवर ‘काना’ काढून त्यावर खडूने गिरवण्यास सांगणे, त्यावर दगड ठेवण्यास सांगणे. तसेच स्वरचिन्हांची कार्डे तयार करून त्याचे खेळ घेणे.

  - स्वरचिन्हांचा खूप सराव घेतल्यानंतर मूलांना चिन्हांची ओळख झाली आहे की नाही हे बघण्यासाठी वेगवेगळे खेळ घेणे. उदाः- मूलाचे डोळे बांधून लोकरीचे स्वरचिन्हे त्याच्यापुढे टाकणे व शिकवलेले स्वरचिन्ह ओळखण्यास सांगणे.

- **जोडाक्षर ओळख** –जोडाक्षर म्हणजे दोन अक्षरांचे मिळून तयार झालेले एक अक्षर होय. त्यातील एक अक्षर अर्धे लिहिलेले असते व दुसरे अक्षर पूर्ण लिहिलेले असते.

वेगवेगळया प्रकाराने जोडाक्षरे शिकविली जातात.

उदा-जोडाक्षरांचा सुरू थांबा, जोडाक्षरांचे फासे इ.

- **वाक्यवाचनः-**

मुलांना वाक्य वाचनाचा सराव देण्यासाठी खेळ घ्यावे.
उदा- 'मगर' ही शब्दपट्टी आहे. शब्दाचे वाचन करुन नंतर त्या शब्दापासून वाक्य बनविण्याचा सराव घेणे.
-ही मगर आहे.
-मगर मोठी आहे. इ.

- **परिच्छेद वाचन** - यामध्ये मुलांच्या क्षमतेनुसार परिच्छेद वाचन देणे.

उदाः- मुलगा जर साधे शब्द वाचत असेल तर-

अजय सरबत कर.

सई सरबत कर.

गणपत कप भर

अशा प्रकारचा परिच्छेद आपण घेऊ शकतो.

- **आकलन** ः साधन साहित्यातून मुलांना मिळणारे शिक्षण हे एक प्रकारच्या अनुभवासारखे असते. व खेळातून ते दिर्घकाळापर्यंत लक्षात राहण्यास मदत होते व स्वतः घेतलेला अनुभव इतरांना सांगणे मुलांसाठी सोपे व सरावाचे असते म्हणजेच जे काही समजले आहे ते स्मरणात ठेवून इतरांना सांगता येणे म्हणजेच आकलन होय.

अशाप्रकारे साधन साहित्य वापरुन मुलांचा भाषा विकास, बौध्दिक विकास साध्य करता येतो.



Door Step School
Education moves on to every doorstep

## एक प्रेरणादायी कविता

बदलण्या गुणवत्तेचे चित्र
एकजुटलो आम्ही शिक्षक मित्र
अध्यापनात वापरुन चलचित्र
अधिकार्यांचीही साथ पवित्र

शाळांच्या भिंतीही केल्या सचित्र
गावकरीही सोबतीला अहोरात्र
थांबवूनी विद्यार्थी गळतीचे सत्र
बदलविले जी.प. व म.न.पा. शाळांचे चित्र।

घडविणे विद्यार्थ्यांचे चरित्र
उद्देश हाच आमचा एकमात्र
देऊया शिक्षण जगण्यास पात्र
घेणार कष्ट करीताअहोरात्र

**संदर्भ-**


1. शिक्षणाची बखर – हेरंब कुलकर्णी
2. आनंदाने शिकण्याच्या दिशेने - खेळघर हस्तपुस्तिका
3. शिक्षणवेध
4. **इंटरनेट-** प्रारंभीचे वाचन शिकवणे- वर्षा सहस्रबुध्दे, रचनावादी शिक्षण

# अनुभवातून शिक्षण

शिकण्याची प्रक्रिया केवळ शाळेतच नाही तर बाहेरही सुरुच असते.सभोवतालचे वातावरण ,निसर्ग, समाजातील व्यक्ती, यांच्याबरोबर जो संवाद साधला जातो त्यातून शिक्षण घडत असते. तसेच संवाद व कृती याद्वारे साधलेल्या परस्पर क्रियेतून शिक्षण घडत असते. व्यक्तीगतरीत्या आणि इतरांसोबत मुले विविध मार्गांनी शिकतच असतात. अनुभव घेणे, लक्षपूर्वक ऐकणे ,वेगवेगळे प्रयोग करणे , वाचन करणे व वाचलेल्या गोष्टींबद्दल चर्चा करणे, बोलणे व लेखनातून स्वतःला अभिव्यक्त करणे. अशा वेगवेगळया मार्गांनी मुले शिकत असतात.

वर्गामध्ये शिक्षण मुख्यत्वेकरुन दोन प्रकारे दिले जाते.

१) **पारंपारिक शिक्षण पध्दत (सरल शिक्षण)** - पारंपारिक शिक्षण पध्दत म्हणजे पूर्वीपासून चालत आलेली, बदल न करता त्याच त्या पध्द्तीने शिकवणे. या पध्द्तीमध्ये जास्तीत जास्त फळयाचा वापर करुन अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर भर दिला जातो.मुलांना तोंडी प्रश्न विचारले जातात, प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी दिल्या जाता त्यासाठी् फक्त मुलांनी पाठांतर करुन पाठ्यपुस्तकातील प्रमाण भाषेचा उपयोग करुन तोंडी उत्तर सांगणे व लिहिणे अपेक्षित असते.

२) **कृतीतून शिक्षण-** मुलांना विविध विषयाचा अनुभव देण्यासाठी बघणे,ऐकणे,चव घेणे,स्पर्श करणे,वास घेणे, आणि निरीक्षण करणे अशा प्रत्यक्ष कृतीचा शिक्षणात उपयोग केला जातो.

ऐतिहासिक गोष्टी शिकवताना मुलांना ऐतिहासिक वास्तूंच्या सानिध्यात नेणे,तसेच म्युझियम बघायला नेणे,निसर्गाविषयी माहिती देताना त्यांना झाडे,फळे,फुले यांची निसर्गाच्या सानिध्यात जाऊन ओळख करुन देणे,मुलांनी स्वतः प्रयोग करण्यास व त्यातून शिकण्यास चालना देणे या गोष्टी कृतीतून शिक्षण यापध्द्तीमधे येतात.

**या दोन्ही** पध्द्तींचा एकत्रित उपयोग करुन मुलांना शिकवले तर मुले अधिक क्रियाशिल होतील.

**“अनुभवातून शिक्षण” ही संकल्पना Modern Education System मधे प्रचलित झाली आहे.**

**प्रत्यक्ष अनुभव –** यात शिकण्याची,शिकलेले वापरुन पाहण्याची, चुका करण्याची, सुधारण्याची संधी मिळते;म्हणूनच प्रत्यक्ष अनुभवातून घेतलेले शिक्षण हे प्रभावी, समजणारे न विसरणारे असे असते.

.जसे.........

मी ऐकले,मी विसरले.

मी पाहिले, माझ्या लक्षात राहिले.

मी अनुभवले,मला समजले.(मी करुन पाहिले मला समजले).

**सहल –** वर्गात काही गोष्टींचा अनुभव मुलांना प्रत्यक्ष देणे शक्य नसल्यामुळे सहलीचे आयोजन करुन अशा गोष्टी जर मुलांनी बघून, ऐकून,हाताळून,निरीक्षण करुन पाहिल्या तर मुलांना समजण्यास सोपे जाते व नवीन अनुभवही मिळतो.

शैक्षणिक सहल नसून ती मुलांसाठी नवीन माहितीचा साठा, ज्ञानाचे भांडार, मनोरंजनाचा मनसोक्त खजिना असल्यामुळे मुलांना यासंधी देणे गरजेचे आहे.म्हणून सहल ही माहिती,ज्ञान, मनोरंजन, या तिन्ही गोष्टींना पुरक ठरते.

मुलांना आपण अनुभवातून शिक्षण कसे देऊ शकतो हे खालील उदाहरणांमधून समजून घेऊया.

उदा.मुलांची सहल भाजी बाजारात नेली.मुलं भाजी विक्रेत्याशी गप्पा मारतील.भाज्या ,वजनाची मापं,तराजू,भाज्यांचे वजन करणे, हे सगळे कुतूहलाने पाह्तील. श्रवण संभाषण आणि निरीक्षण या क्षमतांचा विकास होईल .

भाज्यांची चित्रे व नावे यांच्या जोड्या लावणे, रंग आकार,फळभाज्या-पालेभाज्या, वजन करुन विकायच्या भाज्या,जुडी किंवा वाटे करुन विकायच्या भाज्या यानुसार वर्गीकरण करणे,भाज्यांची गणिते,रुपये-पैसे आणि ग्रॅम किलोग्रॅमची ओळख होते.

मुलांची सहल उद्यानात घेऊन गेलो तर मुले तिथे वेगवेगळया प्रकारची झाडे पाहतील,त्यामध्ये लहान झाडे,मोठी झाडे,वेली, 'शो'ची  झाडे,औषधी वनस्पती कोणत्या आहेत,त्याचबरोबर पानांचे वेगवेगळे प्रकार, आकार,पानांच्या शिरा,यांचेही मुले निरीक्षण करतील. विविध प्रकारची फुले पाहिल्यानंतर मुलांना फुलांचे आकार,रंग,व वास समजतील.झाडाच्या खोडाचे निरीक्षण करतील.उद्यानात असलेली  माती व झाडांवर असणारे पक्षी यांचे निरीक्षण करतील. उद्यानात असलेल्या काही वस्तूंचा उपयोग करुन मुले द्रोण,पत्रावळी तयार करतील.झाडाखाली पडलेली फुले गोळा करुन फुलांनी वेगवेगळे आकार तयार करुन बघतील व फुलांचे वर्गीकरणही करतील.

मुलांनी उद्यानात ज्या गोष्टी पाहिल्या, अनुभवल्या त्या स्वतःच्या शब्दात सांगण्याचा व लिहिण्याचा प्रयत्न करतील.व चित्रातून दाखवण्याचा प्रयत्न करतील.

**प्रयोग** –जे दिसते ते असेच का? हे कृतीतून उलगडून बघणे किंवा एखादी गोष्ट याबद्दल प्रत्यक्ष काही साधनांच्या मदतीने कृती करुन निष्कर्ष काढणे म्हणजे प्रयोग.

विज्ञातील अमूर्त संकल्पना मूर्त होण्यासाठी प्रयोगाची मदत होते.प्रयोग करताना निरीक्षण करणे,अंदाज करणे,अंदाजातील अचूकता शोधण्यासाठी चाचण्या करणे,पुन्हा पुन्हा करुन बघणे,निष्कर्ष काढणे,केलेल्या प्रयोगाचे निवेदन करणे इ .सर्व प्रक्रियेतून गेल्यावर प्रत्यक्षपणे साहित्य हाताळण्याची, करून बघण्याची सवय मुलांना लागते.

प्रयोग करताना मुलांचा जास्तीत जास्त सहभाग घेतला, तर मुलांची शिकण्याची क्षमता वाढते.मुलांना प्रयोगासाठी लागणारे साहित्य मुलांनाच जमा करण्यास सांगणे, दोन गोष्टी एकत्र करणे असे प्रयोग मुलांना करण्यास देणे. उदा. ढवळणे,मेणबत्ती पेटवणे,रोपे लावणे, अ्से छोटे - छोटे प्रयोग मुलांना योग्य सूचना देऊन मुलांना करण्यास सांगणे.

विज्ञानामध्ये काही संकल्पना अशा आहेत,की त्या फक्त वाचून समजणे अवघड असते. जसे सजीव –निर्जीव पारदर्शक अपारदर्शक, बीजांकुरण इ.प

मुले हे प्रयोग स्वतः करुन बघतील.

१) मुले काही बिया घेऊन त्या प्रत्यक्षपणे कुंडीत लावून,कशा प्रकारे बियांना मोड येतात, हे मुले पाहतील व मुलांनी प्रत्यक्ष केल्यावर त्यांना ते पटकन लक्षात येईल.

२) या प्रयोगासाठी मुलांनी दोन कुंडया घेऊन त्या दोन्ही कुंड्यामध्ये झेंडूची सारखीच रोपे लावली,त्यातील एक कुंडी सूर्यप्रकाशात ठेवली व दुसरी कुंडी सूर्यप्रकाश मिळणार नाही(अंधा-या खोलीत)अशा ठिकाणी ठेवली.मुलांनी रोज कुंडीतील रोपाला पाणी घालून रोपाची वाढ कशी होते याचे निरीक्षण करणे.मुलांना दोन्ही रोपांची वाढ कशी होते ते समजेल .

शिकलेला भाग प्रत्यक्ष आयुष्यात वापरुन पहाणे किंवा दैनंदिन अनुभवावरुन शिकणे हे शिकण्याचे एक चांगले माध्यम आहे.

संदर्भ

1. आनंददायी शिक्षण-( भाग-२ )

2. शिक्षण पत्रिका-(जाने२००८

3 .गंमत मोठ्ठ होण्यातली...(..उमा बापट)

4. वाटसरु –(अंक – १६,अनिष कपूर)

| दिनांक | प्रशिक्षण प्रकार | विषय | प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|---|---|
| एप्रिल२०१६ | शिक्षक रिफ्रेशर प्रशिक्षण | सुरक्षा | ४० |
| | नवीन शिक्षक प्रशिक्षण | बाल मानसशास्त्र, विकास, अल्फाबेट्स, बाराखडी, गणित, व्याकरण, गाणी व गोष्टी इ. कसे शिकवावे. आणि वर्गातील तासांचे नियोजन कसे करावे | ३४ |
| | भरे शाळा शिक्षक प्रशिक्षण | शैक्षणिक साधने | १६ |
| | प्रशिक्षक प्रशिक्षण | Growth Mindset | ६ |
| | PPCE आणि ECCC प्रशिक्षण | भाषिक साधनांचा वापर | २३ |
| | सर्व प्रशासन कर्मचारी | इंग्रजी संवाद | २५ |
| | PPCE आणि ECCC प्रशिक्षण | सादरीकरण कौशल्य | २३ |
| | शिक्षक रिफ्रेशर प्रशिक्षण | प्रकल्प पद्धती | २२१ |
| जुन २०१६ | पुस्तक परी रिफ्रेशर प्रशिक्षण | ऐकणे,वाचन,संभाषण | २५६ |
| | कास्प संस्था प्रशिक्षण | विषयाची ओळख व त्याआधारित प्रश्नावली बनवणे. | १६ |
| | पुस्तक परी रिफ्रेशर प्रशिक्षण | संवाद कौशल्य | २५८ |
| | कास्प शिक्षक | क्षेत्रकार्य चर्चा | १६ |
| | कास्प शिक्षक | नियोजन, भाषा पातळी, अल्फाबेट्स, मात्रा, जोडाक्षरे | १६ |
| | शिक्षक रिफ्रेशर प्रशिक्षण | शिक्षणाचा अधिकार | २१४ |
| | PF समन्वयक व पर्यवेक्षक रिफ्रेशर प्रशिक्षण | शिक्षणाचा अधिकार | ३८ |
| | **PGWB** समन्वयक व पर्यवेक्षक रिफ्रेशर प्रशिक्षण | मूल्यमापन भाग २ | ३३ |

एप्रिल २०१६ ते जून २०१६ या कालावधीमधे झालेल्या प्रशिक्षणांची थोडक्यात माहिती वरील तक्त्यातून मिळते.

डोअर स्टेप स्कूलच्या स्टाफला दर महिन्याला वेगवेगळ्या विषयांचे प्रशिक्षण दिले जाते. मे महिन्यात प्रशिक्षण झालेले दिसत नाही कारण मे महिन्यात वार्षिक सुट्ट्या असतात.

## परिवर्तन प्रशिक्षण केंद्रात घेतलेल्या प्रशिक्षणांची काही क्षणचित्रे



डोअर स्टेप स्कूल परिवाराच्या रजनीताई परांजपे प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना.

डी.एस.एस च्या विविध प्रकल्पातील कर्मचारी वर्गास परिवर्तन सेंटर मधील प्रशिक्षकांकडून देण्यात येत असलेले प्रशिक्षण :









“कास्प” संस्थेतील कर्मचारी वर्गास प्रात्यक्षिकासह ट्रेनिंग देताना परिवर्तन ट्रेनिंग सेंटरमधील प्रशिक्षक:





## या अंकात आलेल्या प्रकल्पांच्या संक्षिप्त रुपांचे पूर्ण शब्द.

- PF (Project Foundation) : पाया प्रकल्प
- PGWB (Project Grow with Books) : वाचन संस्कार प्रकल्प
- SOW (School on wheel) : फिरती शाळा प्रकल्प
- ECCC (Every child count citizen campaign) : प्रत्येक मूल मोलाचे
- P.P.C.E. (Parents Participation In Children Education) : मुलांच्या शिक्षणात पालकांचा सहभाग
- CLC (Community Learning Centre) : अभ्यास केंद्र

---

*पुढील अंकाचा विषय 'स्मरण कौशल्ये' हा असणार आहे.*